विशेष दिवाणी दावा क्र. ६४/२०२५

भारत सरकार

वि.

गोविंदरायण मुंद्रा वगैरे

**CNR NO**. **MHRG020000902007**

## निशाणी क्र. १४८ वरील आदेश

(पारित दिनांक ०६.०२.२०२६)

वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० (२) प्रमाणे हा अर्ज केला आहे. वादीचे कथन असे की, मौजे ओढांगी येथील सर्व्हे क्र. ३४/१ व ३४/२ तसेच मौजे बोर्झे, ता. पेण, जि. रायगड येथील सर्व्हे क्र. २८० या मिळकतीच्या मालकी हक्काबाबत मुळ दावा आहे. त्यापैकी मौजे बोर्झे येथील सर्व्हे क्र. २८० या मिळकतीचा नवीन उतारा काढला असता त्यावर मुंबई स्पेशल इकॉनॉमिक झोन कंपनी लि. या नावाची नोंद दिसुन आली. सदरची मिळकत सदर कंपनीच्या नावे हस्तांतरीत झालेली दिसते. परंतु सदरची बाब वादींना नुकतीच समजुन आली आहे. त्यामुळे मुंबई स्पेशल इकॉनॉमिक झोन कंपनी लि. ही कंपनी याकामी आवश्यक पक्षकार आहे. त्यामुळे सदर कंपनीला याकामी प्रतिवादी म्हणुन सामील करण्यात यावे, अशी वादीची विनंती आहे.

०२. प्रतिवादी क्र. ३, ४अे ते ४डी व ५डी यांनी नि.क्र. १५० कडे म्हणणे देवुन अर्जास हरकत घेतली आहे की, सदरची बाब वादींना सुरुवातीपासुन माहिती होती. झालेली त्रुटी भरुन काढण्यासाठी वादीने हा अर्ज दिला आहे, तो फेटाळण्यात यावा अशी या प्रतिवादींची विनंती आहे.

०३. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. वादीचा नि.क्र. १५१ कडील लेखी युक्तीवाद पाहिला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०४. वादीने अर्जामध्ये नवीन सातबाराचे उतारे दाखल केले असल्याचे कथन केले आहे मात्र ते उतारे दाखल केलेले नाहीत. त्यामुळे मुंबई स्पेशल इकॉनॉमिक झोन कंपनी लि. या कंपनीच्या नावे हस्तांतर केव्हा झाले हे समजुन येत नाही. वादीने अर्जामध्ये असे कथन केले आहे की, सातबाराचा ऑनलाईन उतारा काढला असता सदरची बाब त्यांच्या निदर्शनास आली असुन हा अर्ज देण्यास काही दिवसांचा विलंब झाला आहे. परंतु नेमका किती विलंब झाला आहे हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. असे असले तरी सदरची मिळकत मुंबई स्पेशल इकॉनॉमिक झोन कंपनी लि. च्या नावे हस्तांतरीत झाली आहे. अशा परिस्थितीत जोपर्यंत सदर कंपनीला याकामी सामील केले जात नाही तोपर्यंत या दाव्याचा निर्णय गुणदोषावर करणे अडचणीचे होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने वादीने मागणी केल्याप्रमाणे सदर कंपनीला याकामी प्रतिवादी म्हणुन सामील करणे आवश्यक आहे. मात्र उशीराने अर्ज दिला म्हणुन वादीला दंड करणेही न्यायोचित होणार आहे. सबब आदेश.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीने पुढील तारखेपर्यंत रक्कम रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार मात्र) सरकारजमा करण्याच्या अटीवर अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | वादीने पुढील तारखेपर्यंत रक्कम भरुन दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दाखल करावी. |

AMOL ASHOK SHINDE

Digitally signed by AMOL ASHOK SHINDE
Date: 2026.02.09 11:04:36 +0530

**अलिबाग** **(अमोल अ. शिंदे)**

**दिनांकः ०६.०२.२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अलिबाग**